



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २८५, बुधवार ३१ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# आझाद भाऊचे कानावर हात!

## मी नव्हे तर कर्मचारी व संचालकांनी अफरातफर केली






पारनेर : प्रतिनिधी

**मी राजकारणात व्यस्त असल्याने मला संस्थेकडे पाहण्यासाठी वेळ नव्हता. संचालक मंडळ तसेच कर्मचाऱ्यांनी संस्थेत अफरातफर केल्याचे सांगत राजे शिवाजी पतसंस्थेचा चेअरमन आझाद ठुबे याने हात झटकले आहेत.**

सावकारी गुन्हयात अटक केल्यानंतर आझाद याची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने या प्रकरणाशी आपला सबंधच नसल्याचे सांगितल्याची माहीती हाती आली आहे. दरम्यान, कोटयावधींच्या अफरातफरीच्या फिर्यादीवरून संचालक मंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर तालुक्यात एकच खळबळ उडाली असून सर्व संचालक मंडळ पसार झाले आहे.

सहकार कायदा कलम ८३ अ नुसार लेखापरीक्षकाने केलेल्या लेखापरीक्षणात अनेक गंभीर बाबी उघड झाल्या आहेत. व्यवस्थापन समिती व वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व त्या सभेचा काढलेला अजेंडा वारंवार मागणी करूनही तपासणीस उपलब्ध करून देण्यात आले नाही. इतिवृत्त हा संस्थेचा आत्मा असतो. मात्र संस्थेने सदर पुस्तके लिहिलेली नाहीत. अहवाल काळात किती सभा घेतल्या याचा तसेच पंच कमीटीचा मंजुरीचा अहवाल देता येत नसल्याचे या अहवालात नमुद करण्यात आले आहे.

### साखळी करून आर्थिक नुकसान

अहवाल सालात संस्थेने वैयक्तीक कर्ज मर्यादा समुह मर्यादा कर्ज प्रकरणातील कर्ज मर्यादा, संचालक व नातेवाईक यांची कर्ज मर्यादा व विनातारण कर्ज मर्यादेचे उल्लंघन करून आवश्यक ती सर्व कागदपत्रे न घेता कर्ज प्रकरणे केलेली आहे. या कर्ज प्रकरणांमध्ये सत्यं व्दिवेदी, स्वराज आझाद ठुबे, येज्ञसेन पवार, भाऊसाहेब रोहोकले, वैभव रोहोकले, सागर रोहोकले, उज्वला ठुबे, बाळकृष्ण झावरे, युसूफ इनामदार, प्रतिक घोडके, शिराज शेख, आकाश ठुबे, अनिकेत गुंड, संदीप ठुबे, यांना प्रत्येकी दिड कोटी, दिपाली रोहोकले, चंद्रलेखा रोहोकले यांना अडीच कोटी कॅश क्रेडीट देण्यात आले. एकूण कर्जाच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त कॅश क्रेडीट कर्ज देण्यात आले असून त्यातील काही व्यवहार अथवा सर्व व्यवहार साखळी करून संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्याचा अभिप्राय अहवालात देण्यात आला आहे.

### मनी लॉन्ड्रींग ?

राजे शिवाजी पतसंस्थेचे येस बँकेत खाते असून या खात्यावरून दि.२२ एप्रिल २०२२ ते २४ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत सागर असोसिएटस या फर्मच्या नावाने सुमारे २२ कोटी रूपयांचे व्यवहार झालेले आहेत. हे सर्व व्यवहार संशयास्पद असून त्या मनी लॉन्ड्रींग झाले असल्याची शक्यता नाकरता येणार नाही असे चौकशी अहवालात नमुद करण्यात आले आहे. दरम्यान, मिळालेल्या माहीतीनुसार या खात्यावरून रात्रीच्या वेळी रकमा ट्रान्सफर केल्या आहेत.

### ६८ कोटींचा घोटाळा

आझाद ठुबे ५ कोटी २२ लाख १२ हजार ५००, स्वराज आझाद ठुबे १७ लाख ८९ हजार ५००, उज्वला आझाद ठुबे १ लाख, नंदकुमार ठुबे ४६ लाख असा ६ कोटींचा ॲडव्हान्स, विना तारण कर्ज फाईल ४० कोटी, सागर असोसिएटस ट्रान्सफर २२ कोटी असा एकूण अंदाजे ६८ कोटींचा घोटाळा असल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

### मर्यादा ओलांडून स्थावर कर्ज

आझाद ठुबे याने अडीच कोटी स्थावर मालमत्ता तारण कर्ज घेतले असून शोभा व्यवहारे, अशोक ठुबे, ज्ञानेश्वर ठुबे, राजेंद्र ठुबे, तौसीफ इनामदार, किरण शंकर ठुबे यांनीही प्रत्येकी दिड कोटींचे स्थावर कर्ज घेतले असून त्यावरही या अहवालात आक्षेप घेण्यात आला आहे.

# बेकायदेशीर कामांना माझे कधीच पाठबळ नाही

## ■ खा. नीलेश लंके यांचे स्पष्टीकरण ■ लव जिहाद प्रकरणाशी लंके यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न



पारनेर : प्रतिनिधी

**बेकायदेशीर कामांना मी कधीही पाठीशी घालत नाही. त्यामुळे एखाद्या बेकायदेशीर कामासाठी पोलीसांवर मी दबाव आणला असे सांगून एखाद्या प्रकरणाशी माझा संबंध जोडून प्रतिमा मलीन करण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही असा इशारा खा. नीलेश लंके यांनी दिला. दरम्यान, या प्रकरणी देवराम उर्फ गणेश सीताराम धात्रक यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून सबांधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.**

संगमनेरमधील लव जिहाद प्रकारणी मी पोलीसांवर दबाव आणल्याचे चुकीचे वृत्त काही पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आले आहे. वास्तविक अशा प्रकरणासंदर्भात माझ्याशी कोणीही संपर्क केलेला नाही. जरी कोणी अशासाठी संपर्क केला तरी आपण अशा कामांना मी कधीही पाठीशी घालत नाही. मी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा पोलीस कर्मचाऱ्याला फोन केला नसून आगामी विधानसभा निवडणूका डोळयापुढे ठेऊन राजकीय हेतून कोणीतरी वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे लंके यांनी स्पष्ट केले आहे.

खा. लंके म्हणाले, फोटो कोणीही कुणासोबत काढू शकते. त्याचा संबंध जोडून एखाद्यावर बेछूट आरोप करणे चुकीचे आहे. राजकीय हेतूने प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न होत असून ते समजण्याइतकी नगर जिल्हयातील जनता सुज्ञ आहे.

लोकसभा निवडणूकीनंतर माध्यमांनी या निवडणूकीत जातीय ध्रुवीकरणाबाबत मला प्रश्न विचारले असता मला सर्व धर्मियांनी भरभरून मतदान केल्याचे आपण स्पष्ट केलेले आहे. माझ्या मतदारसंघासह राज्यभर माझे सहकारी आहेत. ते कोणत्या जाती धर्माचे आहेत हे मलाही माहीती नाही. कारण केवळ मानवता माणणारा कार्यकर्ता असल्याचेही खा. लंके यांनी स्पष्ट केले.

### बदनामी करणारांवर कारवाई करा

खा. नीलेश लंके यांची तसेच घारगांव गावाची बदनामी केल्याप्रकरणी घारगांव ता. संगमनेर येथील देवराम उर्फ गणेश सीताराम धात्रक यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून आमच्या गावाच्या नावाने निखालस खोटा आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा मजकुर प्रसारीत करून आमच्या गावाची तसेच खा. नीलेश लंके यांची बदनामी करण्यात आली आहे. दोन पोर्टलवर यासंदर्भात बातमी प्रसिध्द करण्यात आली असून ती दिशाभूल करणारी आहे. काही विघ्नसंतोषी लोक गावाच्या नावाचा वापर करून गावाची, जिल्हयाची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. सबंधित पोर्टलवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# देणगीच्या अफरातफरीवरून विश्वस्तांमध्ये हमरा तुमरी!

## १६ हजार आणि ७० हजार रूपये कळीचा मुद्दा



निघोज : प्रतिनिधी

**निघोजचे प्रवेशद्वार असलेल्या वेशीच्या बांधकामासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मळगंगा देवस्थानच्या देणग्यांमध्ये झालेल्या अफरातफरीवरून आजी विश्वस्तांमध्ये तु तु मै मै झाली. ऐन रविवारी सुटीच्या दिवशी हा प्रकार मंदिरातच घडल्याने दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी तो मनोरंजनाचा विषय ठरला.**

प्रवेशद्वाराचा विषय सुरू असताना अफरातफरीच्या वादाला तोंड फुटले. सहा वर्षांपूर्वीचे सोळा हजार रूपये तसेच ते महिन्यात मळगंगा देवीच्या कुंडावरील कुस्ती हगाम्यातील सुमारे सत्तर हजार रूपयांची अफरातफर हा कळीचा मुददा ठरला. एकमेकांनी एकमेकांची उणी दुणी काढत हमरा तुमरी झाली. तो निघोजमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. मंदीरामध्ये हमरा तुमरी, शिविगाळ या पदाधिकाऱ्यांना शोभनिय वाटते का ? असा सवालही करण्यात येत आहे.

रविवारी सकाळी साडेदहा वाजता बैठकीला प्रारंभ झाला. मुळ विषय बाजूला राहून बोलता बोलता कोण कशा प्रकारे देणग्यांची अफरातफर करत आहे. तु सोळा हजार जमा कर, तु सत्तर हजार जमा कर असा वाद अनेक वेळ सुरू होता. अगदी एकमेकांवर धावून जाण्यापर्यंत मजल गेली. अखेर काही शांताप्रिय पुढाऱ्यांनी मध्यस्थी करीत बैठक विसर्जित केली. मात्र मंदिराबाहेर पडतानाही शिवीगाळ सुरूच होती.

### भ्रष्टाचार करून तो पचविण्याची नवी पध्दत !

ही वादळी बैठक सुरू असताना देवीच्या गाभाऱ्यात अभिषेक सुरू होता. अभिषेक करणारी व्यक्ती बाहेरची होती याचे भानही या आजी माजी पदाधिकाऱ्यांना राहिले नाही. निघोज आणि परिसरात कोण कुठे पैसा खातो याची केवळ कुजबुज होती. या बैठकीच्या निमित्ताने ही चर्चा जगजाहिर झाली. देवीच्या साक्षिने भ्रष्टाचार करण्याची आणि तो पचविण्याची नवी पध्दत आजी माजी पदाधिकाऱ्यांनी सुरू केल्याची चर्चा भाविकांमध्ये सुरू होती.

# राज्यात लालपरी'ची चाकं पुन्हा थांबणार?

## ९ ऑगस्टपासून कर्मचाऱ्यांची आंदोलनाची हाक




पुणे : प्रतिनिधी

**राज्यातील एसटी कर्मचारी पुन्हा एकदा संपावर जाणार आहेत. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे आम्हाला वेतन द्या, अशी प्रमुख मागणी राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांची आहे. या मागणीकरता येत्या ९ ऑगस्टपासून राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनात राज्यभरातील १३ एसटी कर्मचारी संघटना सहभागी होणार आहेत.**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटीच्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात यावे, या मागणीसह कामगार कराराच्या तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांना देय होणारा थकबाकी महागाई भत्ता मिळावा, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ थकबाकी अदा करावी, सन २०१६-२०२० या कालावधीसाठी जाहिर केलेल्या रू.४८४९ कोटीमधील शिल्लक रक्कम वाटप करावी आणि सर्वच कामगारांच्या मूळ वेतनात सरसकट ५००० रुपयांची वाढ करावी, अशादेखील काही मागण्या एसटी कर्मचाऱ्यांचा आहेत.

दरम्यान, २०२१ साली महाराष्ट्रातील एसटी कर्मचाऱ्यांनी दीर्घ आंदोलन केले होते. त्यावेळी एसटी बंद झाल्यामुळे राज्यातील दळणवळण ठप्प झाले. सलग ५४ दिवस सुरू असलेला संप २० डिसेंबर २०२१ रोजी मागे घेतला होता. त्यानंतर राज्य शासनाने काही मागण्या मान्य केल्या होत्या. आता नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं आहे.

# रोहित पवारांनी बारामतीमधून लढावे!

## कर्जत-जामखेड मतदारसंघावर काँग्रेसचा दावा



कर्जत : प्रतिनिधी

**कर्जत-जामखेड मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला असून, हा मतदारसंघ पुन्हा एकदा काँग्रेसला मिळावा, अशी मागणी कर्जत-जामखेडमधील काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली आहे. विश्रामगृहावर झालेले पत्रकार परिषदेत काँग्रेसचे कर्जत तालुकाध्यक्ष किरण पाटील, जामखेड तालुकाध्यक्ष शहाजीराजे भोसले, ॲड. कैलास शेवाळे, तात्यासाहेब ढेरे, सचिन घुले, राहुल उगले, बापूसाहेब काळदाते आदी उपस्थित होते.**

कर्जत-जामखेड मतदारसंघात माजी मंत्री आबासाहेब निंबाळकर यांच्यासह विविध नेत्यांनी प्रतिनिधित्व केले. मागील निवडणुकीत (२०१९) काँग्रेस व राष्ट्रवादीत समझोता होऊन ही जागा आ. रोहित पवार यांना देण्यात आली. त्यावेळी रोहित पवार यांच्या विजयासाठी काँग्रेसने प्रामाणिकपणे काम केले, परंतु आ. रोहित पवार यांनी पाच वर्षे मित्रपक्ष म्हणून काँग्रेसची उपेक्षा केली. त्यांच्या पक्षाचे लोक त्यांच्याबरोबर प्रामाणिक राहिले नाही, परंतु आम्ही काँग्रेस म्हणून त्यांच्याबरोबर प्रामाणिक होतो.

आगामी विधानसभा निवडणुकीत कर्जत-जामखेडची जागा काँग्रेसलाच मिळावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व आ. बाळासाहेब थोरात यांच्याकडे करणार आहोत. महाविकास आघाडीने ही जागा काँग्रेसला देऊन भूमिपुत्राला न्याय द्यावा. तसे न झाल्यास सांगलीची पुनरावृत्ती होऊ शकते, असे कार्यकर्त्यांनी सांगितले.

रोहित पवार यांना आम्ही आमदार केले, परंतु त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेतही आम्हाला स्थान दिले नाही. तसेच, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसची उपेक्षा केल्याने आम्ही नाराज असल्याचे कर्जत तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष उर्वरीत पान ३ वर







# चंदेरी

## रिधिमा डिसेंबरमध्ये शुभमन गिलसोबत करणार लग्न ? काय आहे सत्य...



**टेलिव्हिजन अभिनेत्री रिधिमा पंडितबद्दल बातम्या आल्या होत्या की ती क्रिकेटर शुभमन गिलसोबत लग्न करत आहे. अखेर तिने आपण शुभमन गिलसोबत लग्न करत नसल्याचे स्पष्ट केले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये रिधिमा आणि शुभमन विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. अशा चर्चेत तथ्य नसल्याचे रिधिमाने स्पष्ट केले आहे.**

रिधिमाने नुकताच तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यात तिने म्हटले आहे, की मला अनेक पत्रकारांचे कॉल येत होते. त्यांना माझ्या लग्नाबद्दल जाणून घ्यायचे होते. मी लग्न करत नाही आणि जर माझ्या आयुष्यात इतकं महत्त्वाचं काही घडत असेल तर मी स्वतः पुढे येऊन त्याची घोषणा करेन. या बातमीत अजिबात तथ्य नाही, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले. शुभमन गिलने लग्नाच्या चर्चेवर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. याआधी अफवा पसरल्या होत्या की तो क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरला डेट करत आहे. रिधिमा आणि शुभमनचे लग्न डिसेंबर २०२४ मध्ये जयपूर (राजस्थान) येथे होऊ शकते. दोघेही त्यांच्या लग्नाला गुप्त ठेवू इच्छित आहेत. या कथित लग्नात फोन आणि मीडिया कव्हरेजला परवानगी दिली जाणार नाही, अशाही अफवा पसरल्या होत्या.

### कोण आहे रिधिमा

बहु हमारी रजनीकांत आणि खतरा खतरा सारख्या टेलिव्हिजन शो व्यतिरिक्त, रिधिमा २०२१ मध्ये बिग बॉस ओटीटी सीझन १ मध्ये देखील दिसली आहे. २०१९ मध्ये तिने फियर फॅक्टरः खतरों के खिलाडी ९ मध्ये देखील भाग घेतला आणि ती दुसरी उपविजेती ठरली.

## आई, पत्नी अन् आता तरुणी मुलीची भूमिका साकारणार सायली!



टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे पुकार दिल से दिल तक या मालिकेत दिसणार आहे. यापूर्वी तिने पत्नी आणि आईची भूमिका साकारली आहे. आता ती मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. यासाठी ती खूप उत्सुक आहे. याआधीही तिने पडद्यावर आईची भूमिका साकारली होती. वेगवेगळ्या प्रकारची पात्रे साकारून प्रेक्षकांना चकित करण्याची प्रत्येक कलाकाराची इच्छा असते. त्यामुळेच टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे तिच्या पुकार दिल से दिल तक या नवीन शोमध्ये तिच्या भूमिकेबद्दल खूप उत्सुक आहे. सायली तिच्या मागील बातें कुछ अनकही सी या मालिकेत एक समजूतदार पत्नी आणि आईच्या भूमिकेत दिसली होती. या वेळी ती एका तरुण मुलीची भूमिका साकारत आहे. या मालिकेतील वेदिका या भूमिकेला सायली स्वतःच्या अगदी जवळची मानते. सायलीच्या म्हणण्यानुसार, मी माझ्या दोन मालिकांत अशा भूमिका केल्या आहेत ज्या तीस-पस्तीस वर्षांच्या प्रौढ मुलीच्या, एका मुलाची आई आणि या पात्रांच्या होत्या. माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळे होत्या. वेदिका ही २६ वर्षांची बबली मुलगी आहे. ती स्वतः आईपासून विभक्त झालेली मुलगी आहे. नुकताच अभ्यास पूर्ण केला. वेदिका सायलीच्या वैयक्तिक आयुष्यात जवळ असेल तर मग आव्हानात्मक भूमिका कोणती वाटते, याबद्दल ती म्हणाली, की खरे तर गेल्या दोन वर्षांपासून मी आईच्या भूमिकेत एवढी साचेबद्ध झाली आहे की ती मातृत्वाची शैली माझ्या वागण्यात आपोआप येते. मी कोणाशी बोलले तर आपोआप हो बेटा म्हणते. त्यामुळे स्वतःला त्यातून बाहेर काढून मुलीच्या भूमिकेत आणणे हे माझ्यासाठी आव्हान आहे.

### सायली टाईपकास्ट होण्यावर बोलली...



सतत आईची भूमिका साकारताना टाइपकास्ट होण्याची भीती वाटत नव्हती का? यावर सायली म्हणते, की टाईपकास्टचा मुद्दा असता तर मला ही भूमिका मिळाली नसती. दोन शोमध्ये सारख्या भूमिका करूनही जर निर्मात्यांनी मला ही भूमिका दिली असेल तर याचा अर्थ आता टाईपकास्ट असे काही राहिलेले नाही. मला स्वतःवर पूर्ण विश्वास होता की, पस्तीस वर्षांच्या आईची भूमिका साकारल्यानंतर मी कॉलेज पास झालेल्या मुलीचीही भूमिका करू शकते आणि बघा, मी ते करतेय, असे सायली म्हणाली.

# प्रतीक्षेनंतच मिळते गोड फळ!

## आहाना कुमराने केले बॉलीवूड इंडस्ट्रीबद्दल रोचक खुलासे...



**दीड दशकापासून हिंदी चित्रपटसृष्टीत सक्रिय असलेली आहाना कुमरा इंडस्ट्रीतील कोणत्याही गटाचा भाग बनलेली नाही किंवा तिला बनण्याची इच्छाही नाही. ती संयमाची कदर करते आणि थोड्या प्रतीक्षेनंतर त्याचे गोड फळ अनुभवते. अलीकडेच, अहाना लखनऊला आली, जिथे तिने ऑडिशन, ग्रुप्स, कॉमेडी यातून इंडस्ट्रीमध्ये बाहेरचे असण्याचे तोटे उघडपणे सांगितले. कलाक्षेत्रात सध्या ऑडिशन्स एक विनोद बनला आहे, कारण ते आमच्याकडून ऑडिशन घेतात, पण शेवटी फक्त मोठ्या अभिनेत्रीच फायनल करतात, अशी टिप्पणीही आहानाने केली...**



यावेळी दिलेल्या विशेष मुलाखतीत आहानाने सांगितले, की मधल्या काळात मी दोन वर्षे काम केले नाही. पण त्यानंतर रजत कपूर आणि पूरब कोहलीसोबत डेहराडूनमध्ये महिनाभर शूटिंग केले. हा चित्रपट आजच्या पालकांना आणि मुलांना डोळ्यासमोर ठेवून बनवण्यात आला आहे. आजकाल आई-वडिलांमध्ये अनेक मतभेद पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत त्यांच्या भांडणात सहा-सात वर्षांचे मूल भरडले जात असते. आजकाल घटस्फोटही अगदी सामान्य झाले आहेत. मी आईची भूमिका साकारत असून पूरब वडिलांची भूमिका साकारत आहे, तर रजत कपूर माझ्या वडिलांची भूमिका साकारताना दिसणार आहे. आईची भूमिका साकारताना मला भीती वाटत नाही. जर मी आता आईची भूमिका केली नाही तर ८० व्या वर्षात करेन का? आजच्या हिरोइन्सना अशा स्टिरिओटिपिकल भूमिकांमध्ये अडकायचे नसते. मी नेहमीच काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करते. मी कधीच आईची भूमिका केली नव्हती. मला कथा आणि कलाकार आवडले म्हणून मी लगेच तयार झाले. याशिवाय मी एक ॲक्शन मालिकाही करत आहे, असे आहाना म्हणाली.

### घराणेशाही सगळीकडेच...


आहाना म्हणाली, की चित्रपटसृष्टीत लोक फक्त आपल्या मुलांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. अर्थात असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे घराणेशाही नाही... कलाक्षेत्रात पहिल्यांदाच काम मिळणे अवघड आहे. विशेषतः मुलींसाठी. मला पहिल्यांदा काम मिळायला लागेपर्यंत १० वर्षे उलटून गेली होती. आजचा काळ असा आहे की, मोठ्या नियतकालिकांमध्ये प्रतिष्ठित व्यक्तींच्या मुलांची छायाचित्रे छापली जातात, तर आपल्यासारख्या बाहेरच्या लोकांपर्यंत पोहोचायला १०-१५ वर्षे लागतात. महिलांसाठी परिस्थिती अधिक कठीण आहे. कारण त्यांच्यासाठी भूमिका लिहिल्या जात नाहीत. ज्या काही चांगल्या भूमिका लिहिल्या जातात त्याही कुणाच्या तरी मुलीला, कुणाच्या भाचीला किंवा निर्मात्याच्या नातेवाईकाला दिल्या जातात. मी दोन वर्षे काम केले नाही. मी घरीच बसून राहिले. लोक म्हणाले कोणतेही काम हाती घे. मी म्हणाले का घेऊ? ही माझी इच्छा आहे, मी ते करणार नाही. मी आजवर चांगले काम केले आहे, भविष्यातही चांगले काम करेन. वाट बघायला माझी हरकत नाही. खरं तर, वेटिंग गेम कलाकारांसाठीच बनवला जातो. येथे जितका संयम ठेवाल तितके गोड फळ मिळेल. आता संयमाची फळे गोड मिळत आहेत, असेही आहानाने सांगितले.

### मी कोणत्याही गटाची भाग नाही आणि होणार नाही...

आहानाने सांगितले, की मी आधीही नव्हते, आताही नाही आणि भविष्यातही मी कोणत्याही गटाचा भाग होणार नाही. सगळ्यांनाच वाटतं की तुम्ही मोठ्या लोकांच्या पार्ट्यांमध्ये जाल, त्यांच्यासोबत सोशलाइज कराल, डिनर कराल, पण माझ्याकडे या सगळ्यासाठी वेळ नाही. मधल्या काळात मी काही काम केले नाही. मी फक्त संपूर्ण भारताचा दौरा केला. भारताला भेट देऊन खूप मजा आली. कारण आपल्यासारखा दुसरा देश नाही. दक्षिण आणि उत्तर किती वेगळे आहेत? सगळीकडे नवी संस्कृती, नवी संस्कृती आहे. जेवणही ठिकाणानुसार बदलते. मी जगभर फिरले आहे पण भारतातील आदरातिथ्य इतरत्र कुठेही नाही. ट्रॅव्हल शो दरम्यान मला नवीन लोकांना भेटण्याची आणि नवीन कथा ऐकण्याची संधी मिळाली. मी एक वर्ष फक्त प्रवास केला.

### मी अभिनेता आहे, नेता नाही...

फार पूर्वी मुझफ्फरनगरमधील एक पक्ष मला तिकीट देत होता. मला हसू फुटले. सुरुवातीला मला वाटले की हा एक विनोद आहे. तेव्हा तो गंभीरपणे म्हणाला की आम्हाला खरेच तुम्हाला तिकीट द्यायचे आहे. मी म्हणालो का देत आहेस मला? मी अभिनेता आहे, नेता नाही. वेळ मिळेल तेव्हा सामील होऊ पण आता नाही. माझी आई पोलिसांत आहे. आमच्या घरात दिवसभर राजकारणाचीच चर्चा असते. आपण फक्त बातम्या आणि राजकारण बघतो. आमच्या घरात हे वाद-विवाद सुरू असतात, असेही आहानाने सांगितले.



### लोकांना वाटते की नायिका विनोदी नसतात...

आहाना म्हणाली, की प्रेक्षकांना रडवणे सोपे आहे पण हसवणे कठीण आहे. जेव्हा मी सँडविच फॉरएव्हर शो केला तेव्हा माझ्या टीममध्ये माझ्याकडे अतुल कुलकर्णी होता, ज्यांना कधीही कॉमेडीची ऑफर आली नव्हती. मला एक चांगला कॉमेडी शो मिळाला हे मी स्वतःला भाग्यवान समजते. खरे तर असे शो येणे सोपे नसते. लोकांना वाटते की मुली मजेदार नसतात, विशेषतः नायिका. आम्ही सँडविच... केल्यावर अतुल भावूक झाला होता. तो म्हणाला, अरे यार, मला विनोदी भूमिका कोणी देत नाही. मी म्हणायचो, अशा भूमिकाही मला कुणी देत नाही. आम्हा दोघांची कथा एकच आहे. आम्ही झाकीर भाई, दिव्या सेठे, अतुल, कुणाल, लेखक भरत कुकरेजा आणि पंकज सुधीर मिश्रा यांचा एक सुंदर ग्रुप तयार केला. आता आम्ही एकमेकांना सँडविच म्हणतो. आम्ही ते कोविडदरम्यान शूट केले आणि लोकांनी ते फक्त कोविड दरम्यान पाहिले.

**बॉलीवूड अभिनेत्री विद्या बालन सध्या खूप रील बनवत आहे आणि आता तिने ही सवय कशी आणि का लागली हेदेखील सांगितले आहे. आता ती येथे सतत तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करत आहे.**

# विद्या बालनला लागलेय रिल बनवण्याचे वेड



विद्याने दोन वर्षांपूर्वी सोशल मीडियावर एन्ट्री केली होती. आता ती रील बनवत आहे. सोशल मीडियावर रील बनवण्याचा आणि व्हायरल होण्याच्या तिच्या अनुभवाविषयी बोलताना विद्या म्हणाली, की सुमारे दोन वर्षांपूर्वी मी लंडनमध्ये नियात या चित्रपटाचे शूटिंग करत होते, त्यादरम्यान माझ्याकडे खूप वेळ होता. माझ्या व्यवस्थापकाने मला विचारले की आपण रील का बनवत नाही. त्यानंतर तिने गंमत म्हणून ही रील बनवली. ती रील इतकी व्हायरल झाली की विद्याला मग रीलबद्दल आकर्षण वाटू लागले. आता तर ती रीलच्या जणू प्रेमात पडल्यात जमा आहे. ती तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी सोशल मीडियावर सतत रील बनवत आहे. इन्स्टाग्रामवर ९.४ दशलक्ष फॉलोअर्स असलेली ही अभिनेत्री म्हणाली, की मी एक-दोन महिन्यात रील बनवत असे. माझ्याकडे रील शूट करण्यासाठी वेळ होता आणि मी फक्त मजा करत होते. जेव्हा ते व्हायरल झाले तेव्हा मला समजले की मला जे आवडते ते मी केले आणि लोक त्याचा आनंद घेत आहेत. म्हणून मी ते नियमित करू लागले. शिर्षा गुहा दिग्दर्शित दो और दो प्यार या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात विद्या शेवटची पडद्यावर दिसली होती. यात प्रतीक गांधी, इलियाना डिक्रूझ आणि सेंधिल राममूर्ती यांच्याही भूमिका आहेत. विद्या लवकरच भूल भुलैया ३ या आगामी चित्रपटात दिसणार आहे. ती पुन्हा एकदा मंजुलिकाच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. या चित्रपटात विद्यासोबत कार्तिक आर्यन आणि तृप्ती डिमरी देखील दिसणार आहेत. २००७ मध्ये रिलीज झालेला भूल भुलैया पार्ट वन प्रियदर्शनने दिग्दर्शित केला होता. त्यात अक्षय कुमार, शायनी आहुजा, अमिषा पटेल, परेश रावल, राजपाल यादव, मनोज जोशी, असरानी आणि विक्रम गोखले यांचाही समावेश होता. हा चित्रपट ३२ कोटी रुपयांच्या छोट्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. पण २००७ चा आठवा सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट म्हणून उदयास आला होता. या चित्रपटाने जगभरात ८२.८३७ कोटी रुपयांची कमाई केली होती.

# मलायका अन् अर्जुन कपूरमध्ये सर्वकाही अलबेल!; ५ वर्षांपासून देताहेत एकमेकांना साथ

मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचे नाते तुटलेले नाही. हे आम्ही म्हणत नसून त्यांच्या मॅनेजरनेच तसे सांगितले आहे. मलायका आणि अर्जुनबाबत अशी चर्चा सुरू झाली होती, की दोघांत बिनसलेय आणि ते वेगळे होणार आहेत. पण वास्तवात दोघेही एकमेकांच्या प्रेमात खंबीरपणे उभे आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांच्या ब्रेकअपच्या बातमीने अनेक चाहत्यांच्या जिवाला घोर लावला होता. ही बातमी पसरल्यापासून प्रत्येकजण त्यांच्या नात्याबद्दल अंदाज लावत आहे. मलायका आणि



अर्जुन अनेकदा लोकांसमोर येतात आणि एकमेकांसोबत पोज देतात. या जोडीला सर्वात हॉट जोडी देखील म्हटले जाते. २०१८ मध्ये दोघानी आपले नाते अधिकृतरित्या जाहीर केले होते. मलायकाच्या मॅनेजरने ब्रेकअपच्या अफवांचे स्पष्टपणे खंडन केले. हे बॉलीवूड जोडपे वेगळे झाले आहेत का, असे विचारले असता व्यवस्थापक म्हणाला, नाही, नाही, या सर्व अफवा आहेत. २०२२ मध्येदेखील त्यांच्या ब्रेकअपच्या अशाच बातम्या सोशल मीडियावर पसरल्या होत्या. मलायकासोबतचा फोटो पोस्ट करून अर्जुनने या बातम्यांवर प्रतिक्रिया दिली होती. तिने एका चिठ्ठीसह कॅप्शन दिले आहे की, संशयास्पद अफवांना जागा नाही. सुरक्षित राहा. आनंदी रहा. लोकांना शुभेच्छा द्या. आम्ही तुम्हा सगळ्यांवर प्रेम करतो...

## शॉर्ट न्यूज

### जामखेड आगारात चिखलाचे साम्राज्य

**जामखेड :** आगारात सर्वत्र चिखलासह घाणीचे साम्राज्य पसरले आहे. चिखल, दलदलीमुळे कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. चिखलामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या पायाच्या बोटांना जखमा झाल्या आहेत. दलदल, ओलसरपणामुळे अनेक ठिकाणी वीजप्रवाह उतरत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालून बसचे काम करावे लागत आहे. बस आगारातील या समस्यांमुळे कर्मचारी काम बंद आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत.

### जळीत घटनेनंतर सामाजिक बांधिलकीचे दर्शन

**नेवासा :** शहरातील नगरपंचायत चौकात असलेल्या चौदा दुकानांना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास अचानक आग लागल्याने व्यापाऱ्यांचे १ कोटी १५ लाखांचे नुकसान झाले. या घटनेचे गांभीर्य बघता एक नेवासकर नागरिक म्हणून वैयक्तिक मदत करीत अनेकांनी व्यापारी बांधवांच्या मदतीला धावल्याने पुन्हा एकदा शहरात सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले आहे. ज्या गोष्टींची गरज व्यावसायिक बांधवांना पाहिजे होती, ती नेवासकर जनतेने देण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे. संजय सुखदान यांनी सोशल मीडियावर येऊन आवाहन केले होते. बघता बघता मदतीचा ओघ सुरू झाला आहे.

### शिर्डी परिसरातील गुन्हेगारीला आळा घाला

**शिर्डी :** शिर्डी आणि परिसरामध्ये गुन्हेगारीचा अड्डा झालेला असून चोऱ्यांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. यामध्ये दुचाकी व चारचाकी गाड्यांच्या चोऱ्या त्याचबरोबर साई भक्तांकडील दागिन्यांच्या चोऱ्या यांचे प्रमाण जास्त आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने तत्काळ लक्ष चोऱ्या व गुन्हेगारी कमी करावी, असे निवेदन भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी पोलीस अधिक्षक अहमदनगर यांना दिले.

### चंदनापुरी येथे विकास कामांचे लोकार्पण

**संगमनेर :** तालुक्यातील चंदनापुरी येथे माजी महसूल मंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या स्थानिक विकास निधीतून ५ कोटी २७ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला. प्रसंगी आमदार बाळासाहेब थोरात, खा. भाऊसाहेब वाकचौरे, डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, दुर्गा तांबे, युवक काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, बाबासाहेब ओहोळ, रणजितसिंह देशमुख सहित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आमदार थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### दत्तकृपा एमएडचा ९४ टक्के निकाल


**श्रीगोंदा :** घारगाव (ता. श्रीगोंदा) येथील श्री दत्तकृपा शिक्षण संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय (एम. एड.) कॉलेजचा निकाल ९४ टक्के लागला. यामध्ये मुलींनी बाजी मारली. दीप्ती बबन हराळ ७८. ३५ टक्के प्रथम, ऊर्मिला रवींद्र मुळे ७५. २५ टक्के द्वितीय, निलोफर सय्यद ७४. १ टक्के तृतीय क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांचे यशाबद्दल श्री दत्तकृपा शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष बाळासाहेब साळुंखे, सचिव अर्चना पानसरे, रजिस्ट्रार कल्याण शिंदे, प्राचार्य डॉ. एम. आर. गोंटे यांनी कौतुक केले.

# ‘लाडकी बहीण’साठी पोस्टात २७ दिवसांत ५५९४३ खाती

### नियोजन करत खाते उघडण्यास प्राधान्य

**नगर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्य सरकारनेजूनमध्ये पावसाळी अधिवेशनात जाहीर केली. ही योजना १ जुलैपासून प्रत्यक्ष लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. लाभार्थी बहिणीला १५०० रुपये दिले जाणार आहेत. यासाठी बँक खाते असणे आवश्यक आहे. ते उघडण्यासाठी बँकेत, मान्यता असलेल्या ऑनलाइन सेंटर आणि टपाल कार्यालयात महिलांची गर्दी होत आहे. १ ते २७ जुलै या २७ दिवसांत जिल्ह्यातील पोस्ट बँकेत५५९४३ महिलांनी खाते उघडली आहेत.**



खाते उघडण्यासाठी २५० रुपये खर्च येत आहे. टपाल खात्याच्या माध्यमातून १ कोटी ३९ लाख ८५ हजार ७५० रुपयांची उलाढाल झाली आहे. १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होणार असल्याने बँक खाते उघडण्यासाठी महिलांची धडपड सुरू आहे. सर्वात कमी शुल्क पोस्ट बँकेत लागत असल्याने पोस्ट बँकेचे खाते उघडण्याला लाडक्या बहिणी प्राधान्य देत आहेत. केडगाव टपाल कार्यालयातील पोस्टमन अंबादास सुद्रीक, शिवाजी कांबळे, अनिल धनावत, सुनील जाधव, सूर्यकांत श्रीमंदिलकर हे त्यांचे नियमित टपाल वाटपाच्या कामासह हे खाते उघडत आहेत.

**टपाल खात्याला प्राधान्य**

शासकीय बँकेत बँक खाते उघडण्यासाठी होणारी गर्दी आणि किचकट अटी यामुळे बहुतांश महिला खाते उघडण्यासाठी टपाल कार्यालयाला प्राधान्य देत आहेत

**पोस्ट बँक खात्याचे फायदे**

रोखीने पैसे ठेवणे व काढणे यावर मर्यादा नाही, बिल पेमेंट व रिचार्ज व्यवहार मोफत, पैसे ठेवणे व काढण्याची घरपोच सेवा मोफत, व्हर्चुअल डेबिट कार्ड सुविधा

**गावांमध्ये मेळावे घेऊन खाते उघडली**

खाते उघडण्यासाठी जास्त कागदपत्रांची आवश्यकता नसल्याने महिलांना खाते उघडणे सोयीचे आहे. त्यामुळे महिलांची गर्दी होत आहे. सर्व पोस्टमन व ग्रामीण डाक सेवक यांना तत्पर सेवा देण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. काही गावांत मेळावे घेऊनही खाते उघडण्यात येत आहेत.

**संदीप हदगल,** सहाय्यक डाक अधीक्षक,अहमदनगर विभाग

**खाते उघडण्यास प्राधान्य**

“लाडकी बहीण या योजनेसाठी पोस्टल बँकेचे खाते उघडण्यास टपाल कार्यालयात गर्दी होत आहे. त्यासाठी योग्य नियोजन करत खाते उघडण्याकरिता प्राधान्य दिले जात आहे.

**संतोष यादव,** पोस्टमास्तर,केडगाव.

---

**वाचकांच्या लेखणीतून**

### महाराष्ट्र टाइम्स आणि माझ्या वृत्तपत्रीय लेखनाचा श्रीगणेशा

१९७८ साली महाविद्यालयीन शिक्षणासाठी मी मुंबईला गेलो. तिथे आमच्या घरी महाराष्ट्र टाइम्स वर्तमानपत्र नित्यनेमाने येत असे. ते महाराष्ट्र राज्यातील मराठी वृत्तपत्रसृष्टीतील एक आघाडीचे वर्तमानपत्र होते. आजही आहे. त्यावेळेस गोविंद तळवलकर (१९२५-२०१७) या दैनिकाचे संपादक होते. अग्रलेख, धावते जग ही सदरे आणि रविवारची साप्ताहिक मैफल पुरवणी मला फार आवडत असे. स्वतः तळवलकर वाचता वाचता, प्रासंगिक, बहर, परिक्रमा आदी स्तंभलेखन करीत असत. ते एक साक्षेपी संपादक असून त्यांचे अग्रलेख आजही वाचनचिंतन करण्यासारखे वाटतील. याच आघाडीच्या वृत्तपत्रात १९८७ साली कावळा: वास्तव आणि कल्पना हा माझा पहिलावहिला लेख,




नवनवलाची नवी बाहुली ही पहिलीवहिली बालकविता आणि (शिवचरित्रासंबंधी) पहिलेवहिले पत्र प्रकाशित झाले हे मी माझे भाग्य समजतो! त्यामुळेच मला पत्रकारिता शिकण्याची आणि वृत्तपत्रीय लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. पुढे मी अन्य वृत्तपत्रांतूनही लेख, कविता आणि पत्रलेखनही करू लागलो. पण हा भाग नंतरचा...

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

---

# नगरमध्ये १२ ऑगस्ट रोजी धडकणार मराठ्यांचे वादळ

### महाशांतता रॅलीची जय्यत तयारी सुरू



**नगर : प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आरपारच्या लढाईसाठी मैदानात उतरलेल्या मनोज जरांगे पाटील यांची महाशांतता रॅली १२ ऑगस्ट रोजी नगरमध्ये होणार आहे. मराठा क्रांती मोर्चानंतर पुन्हा एकदा नगरमध्ये मराठ्यांचे वादळ धडकणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी सोलापुरातून सुरू केलेल्या शांतता रॅलीचा समारोप १३ ऑगस्ट रोजी नाशिकला होणार आहे, अशी माहिती सकल मराठा समाजाकडून देण्यात आली.**

शांतता रॅलीद्वारे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी करणार आहे. मनोज जरांगे हे ७ ते १३ ऑगस्ट पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असणार आहेत. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर येथे ते पोहोचणार असून छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही शांतता रॅली निघणार असल्याचे धनाजी साखळकर यांनी सांगितले. सांगावा आलाय पाटलांचा, पुढील मोहिमेचा अशा पद्धतीने सोशल मीडियावर हा मेसेज संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात फिरू लागला असून जरांगे पाटील यांच्या दौऱ्यामुळे अनेक नेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

असा असेल मनोज जरांगेंचा दौरा

मनोज जरांगे पाटील हे ७ ऑगस्ट रोजी सोलापूर येथे शांतता रॅली काढणार असून मुक्काम सोलापुरात असणार आहे. त्यानंतर ८ ऑगस्ट रोजी सांगली, ९ ऑगस्ट रोजी कोल्हापूर, १० ऑगस्ट रोजी सातारा जिल्हा, ११ ऑगस्ट रोजी पुणे, १२ ऑगस्ट रोजी नगर आणि १३ ऑगस्ट रोजी नाशिक जिल्ह्यात या शांतता यात्रेचा समारोप होणार आहे.

# येत्या विधानसभा निवडणुकीपूर्वी श्रीरामपूर जिल्हा करा

### ९ ऑगस्ट रोजी जेलभरो आंदोलनाचा इशारा

**श्रीरामपुर : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्ह्याचे विभाजन करून येत्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी श्रीरामपूर जिल्हा करावा, या मागणीसाठी शुक्रवारी, ९ ऑगस्ट क्रांती दिनी जेल भरो आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. श्रीरामपूर जिल्हा कृती समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभुवन, कार्याध्यक्ष बाबा शिंदे, सचिव राजेंद्र सोनवणे, संघटक अशोक उपाध्ये, उपाध्यक्ष संदीप मगर, सहसचिव मुक्तारभाई शहा यांनी श्रीरामपूर शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना निवेदन दिले.**



या निवेदनात म्हटले आहे की, याच दिवशी आपल्या क्रांतिवीरांनी भारत देश स्वातंत्र्यासाठी लढा उभा केला होता.त्यात ते यशस्वी झाले होते म्हणून आपण देखील याच महत्त्वाच्या क्रांती दिनी श्रीरामपूर जिल्ह्यासाठी क्रांतीचा लढा उभारुया आणि यशस्वी होऊ या. आपण बघितले श्रीरामपूरतील प्रत्येक माणूस आज झोपी गेलेला आहे. काहींनी तर झोपेचं सोंग घेतले आहे. आपण बघितले पाहिजे. राहाता तालुक्यातील एका गावांमध्ये दहा ते पंधरा एकर जागेमध्ये शासकीय कार्यालयाचे फार मोठे बांधकाम चालू आहे. निश्चितच ते शिर्डी जिल्हा करून जिल्ह्याचे मुख्यालय त्या ठिकाणी करण्याचा मानस असल्याची जोरदार चर्चा सध्या शासकीय पातळीवर सुरू आहे.
शिर्डी जर जिल्हा झाला, तर श्रीरामपूरचे वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही. कारण भंडारदऱ्याचे हक्काचे पाणी मिळणे मुश्किल होईल.

कारण शिर्डीमध्ये एमआयडीसी असल्याकारणाने सर्व आपल्या श्रीरामपूरच्या हक्काचे पाणी त्या एमआयडीसीला पुरवल्या जाईल, तसा कायदा करण्याचे जोरदार प्रयत्न देखील नेतेमंडळीचे चालू आहेत. तरी पण श्रीरामपुरातील सर्व पक्ष, संघटना, व्यापारी, श्रीरामपूरकर यांना कसे समजेना झाले. जोपर्यंत प्रत्येक श्रीरामपुरातील नागरिक रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन करून आंदोलनाचा आगडोंब उभा करणार नाही, तोपर्यंत सरकार आपले ऐकणार नाही. प्रत्येक श्रीरामपूरकरांनी हे लक्षात ठेवायला पाहिजे. या आंदोलनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वाभिमानी श्रीरामपूर जिल्हा कृती समितीच्या वतीने करण्यात आले.

**चक्काजाम आंदोलनासह जेलभरो आंदोलन**

आपल्या मुलांचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी श्रीरामपूरला गतवैभव प्राप्त करण्यासाठी, श्रीरामपूरवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी श्रीरामपूरातील प्रत्येक नागरिकांनी श्रीरामपूर जिल्ह्याच्या चळवळीमध्ये मोठा सहभाग नोंदवून श्रीरामपूर चक्काजाम आंदोलन केले पाहिजे . या मागणीसाठी शुक्रवारी, ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता गांधी पुतळ्याजवळ जेलभरो आंदोलन होणार आहे.

---

(पान १ वरून)

### रोहित पवारांनी बारामतीमधून लढावे!

सचिन घुले यांनी सांगितले.
आमदार रोहित पवारांनी आता बारामतीत लढावे आ. रोहित पवार यांच्याऐवजी काँग्रेसला जागा मिळेल का, या प्रश्नावर काँग्रेस नेते ॲड. कैलास शेवाळे म्हणाले, की उपमुख्यमंत्री अजित पवार महायुतीसोबत गेल्याने आ. रोहित पवार यांच्यासाठी बारामतीची जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे त्यांनी बारामती विधानसभेतून निवडणूक लढवावी. दक्षिणेत काँग्रेसला एकही जागा नाही. या मतदारसंघात काही प्रमाणात अजित पवार यांचा प्रभाव आहे. आता ते शरद पवार यांच्यापासून बाजूला गेल्याने येथे मतांची विभागणी होणार आहे. आमचा काँग्रेसचा मतदार जागेवर असल्याने येथील जागा आम्हाला मिळावी, अशी मागणी शहाजीराजे भोसले यांनी केली.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

- प्रसूती विभाग
  - प्रसूती पूर्व तपासणी
  - संपूर्ण प्रसूती उपचार
  - अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
- गर्भपिशवीचे आजार
  - अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
  - गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
  - गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
- Infertility वंधत्व उपचार
  - वारंवार होणारे गर्भपात,
  - लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
  - पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
  - टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
- स्तनांचे आजार आणि उपचार
- PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
- सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# निसर्गसंपन्न पानोली घाटाची पर्यटकांना भुरळ!

## हिरवे हिरवे गार गालिचे... हरित तृणांच्या मखमालीचे! रिमझिम पावसात पर्यटक लुटताहेत आनंद

**पानोली : सतीश डोंगरे**

**हिरवेगार डोंगर आणि टेकड्या... खळखळून वाहणारे लहान मोठे झरे... मध्येच अंगाला झोंबणाऱ्या मंद हवेची झुळुक... पक्ष्यांचा चिवचिवाट... मुक्तपणे बागडणारे हरणांचे कळप... एकिकडे उंचच उंच डोंगर आणि दुसरीकडे खोल दऱ्या आणि या दोन्हींच्या मधून जाणारी नागमोडी वळणाची डांबरी सडक... हिरवे हिरवे गार गालिचे... हरित तृणांच्या मखमालीचे... ! या बालकवींच्या कवितेची आठवण यावी, असे हे निसर्गरम्य वातावरण सध्या पर्यटकांना भुरळ घालत आहे.**




तुम्ही म्हणाल, हे कोकणातील एखादे स्थळ असेल. मात्र, हे विहंगम दृश्य आहे राळेगण सिध्दीवरून पारनेरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पानोली घाटाचे. हिरवागार झालेला हा परिसर सध्या शहरवासीयांना खुणावतोय. या रस्त्याने घाटातून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना आकर्षित करतोय, रिमझिम पावसाचा आनंद घेत रविवारी दिवसभर अनेकांनी सहकुटुंब, मित्र परिवारासोबत या घाटातून जाताना मुद्दाम थांबून निसर्गाचा मुक्तहस्ते आनंद लुटला.

गेल्या महिनाभरातील पावसाने पानोली घाटातील डोंगररांगा आणि टेकड्या हिरव्यागार झालेल्या आहेत. त्यामुळे ढगाळ वातावरण, पावसाची भुरभुर असतानाही रविवारी घाटात ठिकठिकाणी थांबून पर्यटक निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटत होते.

### घाटात आनंद लुटताना काळजी घ्या !

- वाहने सुरक्षित ठिकाणी उभी करा व हँडब्रेक लावल्याची खात्री करा.
- लहान मुलांची विशेष काळजी घ्या.
- घाटात मद्यपान आणि हुल्लडबाजी करु नका.
- संरक्षित कठड्यावर उभे राहून सेल्फीचा मोह टाळा.
- वन्यप्राण्यांना त्रास होईल असे वर्तन करु नका.
- घाटात निसरड्या रस्त्यावरुन दरीत उतरणे टाळा.
- जास्त खोल पाण्यात किंवा वाहत्या प्रवाहाच्या ठिकाणी जाऊ नका.
- अति उत्साहाच्या भरात थ्रील आणि रिल्ससाठी नसते धाडस करु नका.
- पर्यटनाच्या नादात जीवाशी खेळू नका, आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्या.

रविवारी (दि. २८) साखरपुड्याचा मुहूर्त असल्याने पारनेरसह तालुक्यात अनेक ठिकाणी साखरपुड्याचे कार्यक्रम होते त्यामुळे शहरातील पाहुणे मंडळी या कार्यक्रमासाठी पानोली घाटातून जात असताना निसर्गाचा चमत्कार पाहण्यासाठी घाटात ठिकठिकाणी थांबून आनंद लुटत होते. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने काहीजण सहकुटुंब घाटाच्या वर असणाऱ्या सिध्देश्वर वाडीतील देवाच्या दर्शनाला आले होते. ते ही घाटात मजा लुटत होते.सहकुटुंब आलेले परिवार मोबाईलमध्ये सेल्फी, फोटोच्या लगबगीत असताना हौशी छायाचित्रकार निसर्गाच्या किमया टिपण्यात दंग होते.

सकाळी आठच्या सुमारास तर घाटातील डोंगराला स्पर्श करून पळणाऱ्या ढगांमुळे माथेरान, महाबळेश्वरसारखे विलोभनीय दृश्य डोळ्याचे पारणे फेडणारे होते. पावसामुळे निसरड्या वाटेवरून कसरतीने ट्रेकिंग करत पठारावर पोहोचल्यावर नजर पुरेल तिथपर्यंतची हिरवळ, त्यातून वाहणारे नितळ पाण्याचा खळखळाट, रानफुलांची उमलायला झालेली सुरुवात आल्हाददायक वाटत होती. त्यात अधूनमधून पडणारा रिमझिम आनंद द्विगुणित करीत होता. घाटातील उंच पठारावरून घाटाच्या पायथ्याशी पहुडलेल्या पानोली गावचे धूसर ढगातून दिसणारे विहंगम दृष्य डोळ्यात साठवून ठेवावे असे दिसत होते.

# झावरे परिवाराचे करंदीशी ऋणानुबंध - सुजित झावरे



**करंदी : प्रतिनिधी**

**मा. आ. स्व. वसंतराव झावरे यांचे करंदी गावाशी ऋणानुबंध होते. हे ऋणानुबंध जपण्याचे काम आपण करीत असल्याचे सांगत जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी करंदीच्या विकास कामांसाठी आपण सदैव कटीबध्द असल्याचे सांगितले.**

झावरे यांच्या विशेष प्रयत्नातून पानंद रस्ते योजनेअंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या २५ लाख रूपये खर्चाच्या करंदी ते कडाणे वस्ती या रस्त्याचे भुमिपुजन झावरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना झावरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना झावरे म्हणाले, मा. आ.स्व. वसंतराव झावरे यांनी आपले जीवन समाजासाठी समर्पित केले. आयुष्यभर समाजातील रंजल्या गांजलेल्यांच्या, वंचितांच्या न्यायय हक्कासाठी त्यांनी लढा दिला. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन आपणही समाजातील प्रत्येक घटकाच्या भल्यासाठी अहोरात्र कार्यरत असतो. आपल्या हाती कोणतीही सत्ता नसताना तालुक्यातील प्रत्येक तालुक्यात विकास कामे राबवून आपण आपले कर्तव्य बजावले असून कर्मण्येवाधिकारस्ते मा फले शु कदाचन या उक्तीप्रमाणे आपली वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

भुमिपुजन समारंभासाठी सरपंच नंदाताई गव्हाणे, उपसरपंच अर्जुन ठाणगे, व्हा. चेअरमन तथा ग्रामपंचायत सदस्य प्रकाश ठाणगे, दत्तोबा ठाणगे, शरद गोरे, अर्जुन ठाणगे, सावळेराम ठाणगे, भास्कर गव्हाणे, राधुजी ठाणगे, बबन चौधरी, पांडूरंग ठाणगे, नवनाथ ठाणगे, जिजाभाऊ थोरात, पाटील सर, ठका थोरात, प्रदीप माने, किशोर ठाणगे, गोरख ठाणगे, मारूती चौधरी, जितेंद्र उघडे, अमोल गांगड, शांताराम चौधरी, अरूण चौधरी, दिपक ठाणगे, भास्कर ठाणगे, साहेबराव चौधरी, संतोष ठाणगे, सुभाष चौधरी, साहेबराव नरसाळे यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# पारनेर ग्रामीणच्या सभासद वारसास १ लाखांचा अपघात विमा

## चेअरमन काशिनाथ दाते यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द




**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**खडकवाडी परिसरातील चिमणी बारव भागात अज्ञात वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत पावलेले पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे सभासद कुशानाथ रंगनाथ हुलावळे यांच्या वारस त्यांच्या पत्नी कविता यांना १ लाख रूपयांचा अपघात विम्याचा धनादेश संस्थेचे चेअरमन काशिनाथ दाते यांच्या हस्ते देण्यात आला.**

हुलावळे यांचे अपघाती निधन झाल्याची माहीती खडकवाडी येथील ग्रामस्थ विकास रोकडे, अमोल रोकडे, अनिल गागरे यांनी संस्थेचे चेअरमन काशिनाथ दाते यांना दिल्यानंतर सभासद वारसांच्या अपघात विमा योजनेतून हुलावळे यांच्या वारसांना मदत मिळवून देण्याच्या सुचना दाते यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांना दिल्या होत्या. थोरात यांनी सर्व माहीती संकलीत करून युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे विम्याचा प्रस्ताव सादर केला. विमा कंपनीकडून शहानिशा करण्यात आल्यानंतर कंपनीच्या वतीने एक लाख रूपयांना धनादेश संस्थेकडे पाठविण्यात आला.

चेअरमन काशिनाथ दाते यांनी खडकवाडी येथे जाऊन हुलावळे यांच्या पत्नी कविता यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अमोल रोकडे, विकास रोकडे,डॉ. सुदाम आहेर, विठ्ठलराव ढोकळे, एम.एन.ढोकळे, शंकरराव नवले, गणेश चौधरी, देविदास साळुंके, बाळासाहेब शिंगोटे, प्रकाश शेवंते, बी.टी. खणकर, नारायण फटांगरे, शिवाजी रोकडे, इंद्रभान ढोकळे, कृष्णा शिंदे, सखाराम नवले, अरूण गागरे, बबन गागरे, नामदेव हुलावळे आदी उपस्थित होते.

### पारनेर ग्रामीण परिवाराला धन्यवाद

**माझ्या पतीचे अपघाती निधन झाल्यानंतर पाहुण्या, रावळयांनी मदतीचा हात दिला. माझी दोन लहान मुले आहेत. पारनेर ग्रामीण पतसंस्थेने अपघात विम्याची रक्कम जमा केल्याने आमच्या कुटूंबाला एक लाख रूपयांची मदत मिळाली. पारनेर ग्रामीण पतसंस्था परिवारास मी धन्यवाद देते.**

**कविता कुशानाथ हुलावळे**

# निघोज परिसरातील मोरवाडी येथे नामयज्ञ सोहळा

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**निघोज : प्रतिनिधी**




**निघोज परिसरातील मोरवाडी येथे परमपूज्य जोग महाराज शतकोत्तर पुण्यस्मरण व श्री संत शिरोमणी सावता महाराज व विठ्ठल रुक्मिणी सप्ताह निमित्त दि.१ ऑगस्ट ते दि.८ ऑगस्ट पर्यंत नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हे ३१ वे वर्ष आहे.**

या नामयज्ञात श्रीराम महाराज घुले रावडेवाडी, रामदास महाराज सरकटे आळंदी, वाणीभुषण संतोष महाराज कौठाळे देवदैठण, रामेश्वर महाराज भोजने आळंदी,अक्षय महाराज उगले नेवासा, कैलास महाराज येवले आळंदी, सुदामकृष्ण महाराज शास्त्री वृंदावन, गुरुवार दि.८ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत सुदामकृष्ण महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. अशाप्रकारे नामवंत किर्तनकार मोरवाडी व परिसरातील भाविकांनी यासाठी योगदान दिले असून या नामयज्ञ सोहळ्यास भाविक व ग्रामस्थ यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मोरवाडी ग्रामस्थ व मुंबईकर मंडळी यांनी केले आहे.

# डॉ.बाबासाहेब बांडे यांचे निधन

## वैद्यकीय व्यावसायिक ते ग्रामीण साहित्यिक

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**



**येथील डॉ.बाबासाहेब काशिनाथ बांडे यांचे सोमवारी सकाळी निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८४ वर्ष होते, त्यांच्या मागे, पत्नी, दोन मुले, दोन मुली, एक भाऊ, पुतणे, असा परिवार आहे.**

भाळवणी, येथे त्यांनी अनेक वर्ष वैद्यकीय सेवा केली, माजी आमदार दिवंगत बाबासाहेब ठुबे यांचे बरोबर त्यांनी पारनेर तालुक्यात कम्युनिष्ठ चळवळीत काम केले. शेती व शेतकरी हा विषय केंद्र बिंदू मानून त्यांनी मृदगंधा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला, या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ, श्रीकांत गदरे, कवी चंद्रकांत पालवे व अनेक नामांकित कवी, लेखक यांच्या हस्ते करण्यात आले होते.

त्यांच्या शेतकऱ्यांच्या जीवनावर अनेक कविता राज्य पातळी पर्यंत गाजल्या.टाकळी ढोकेश्वर येथे कवी संमेलनासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

मा.आ.बाबासाहेब ठुबे यांच्या मोर्चे, आंदोलनात सक्रिय त्यांचा सहभाग असे,पारनेर तालुक्यात कम्युनिस्ट चळवळ त्यांनी वाढविली होती, पारनेर तालुक्यातील साहित्यिक चळवळ रुजवावी यासाठी ते प्रयत्नशील होते.अनेक ग्रामीण कवी संमेलनात त्यांचा सहभाग असत.

# भोयरे गांगर्डा येथे शिक्षण सप्ताहाची सांगता

## विविध उपक्रमांचे आयोजन



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथील श्री दत्त विद्यालयात शिक्षण सप्ताहाची उत्साहात सांगता करण्यात आली.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या ४ थ्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्याचे शाळांना आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत असताना भोयरे गांगर्डा येथे शिक्षण सप्ताहात प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण व विद्यार्थी विकासाचे विविध पैलू यांचा समावेश यामध्ये होता. यामध्ये शिक्षकांनी अध्यापन करत असताना विविध शैक्षणिक साहित्याचा अवलंब केला तसेच जे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत अशाकडे विशेष लक्ष देण्यात आले.

क्रीडा दिवस साजरा करताना विविध देशी खेळांचे प्रात्यक्षिक दाखवून खेळांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. खेळात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला तसेच पारंपारिक लोककला जिवंत ठेवण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते तसेच काही विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले.

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने वृक्षारोपण करताना विद्यालय परिसरात चिंच, पिंपळाची झाडे लावली. शिक्षक सुदाम दळवी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असताना संस्कार योग प्राणायाम याविषयी माहिती दिली व शिक्षण सप्ताहाची सांगता होत असताना सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक भगवान रसाळ, सुदाम दळवी, सुभाष मेंगवडे, ज्ञानेश्वर उमाप, बाळासाहेब आढाव, दत्ता इथापे, श्रीकृष्ण गोंटे, ओम धानगुडे आदींनी परिश्रम घेतले.

# महिलांचा उपक्रमांमधील सहभाग कौतुकास्पद - राणीताई लंके





जामगांव येथे महिला ग्रामसंघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस राणीताई लंके यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला.

**जामगांव : प्रतिनिधी**

**बचत गटांबरोबरच महिला प्रभाग संघांच्या माध्यमातून महिलांचा असलेला सहभाग कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई नीलेश लंके यांनी केले.**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंचायत समिती पारनेर अंतर्गत ढवळपुरी प्रभागातील प्रेरणा महिला प्रभाग संघाची सन २०२३-२४ ची दुसरी वार्षीक सर्वसाधारण सभा नुकतीच जामगांव येथे संपन्न झाली. या सभेसाठी राणीताई लंके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. सरपंच पुष्पा माळी, जिल्हा व्यवस्थापक सरोदे हे यावेळी उपस्थित होते.

दिप प्रज्वलनाने सभेस प्रांरभ झाला. यावेळी ढवळपुरी प्रभागातील सुकन्या ग्रामसंघ काळकुप, सिध्दीविनायक ग्रामसंघ भाळवणी, संकल्प ग्रामसंघ जामगांव, नागेश्वर ग्रामसंघ भाळवणी, प्रगती ग्रामसंघ दैठणे गुंजाळ, एकता ग्रामसंघ धोत्रे, स्त्री शक्ती ग्रामसंघ ढवळपुरी, शिवशक्ती ग्रामसंघ लोणी, स्त्री नारही शक्ती ग्रामसंघ सारोळा, माऊली ग्रामसंघ पाडळीतर्फे कान्हूर अशा १० ग्रामसंघांच्या ८०० ते ९०० महिला तसेच प्रभाग संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

तालुका व्यस्स्थापक स्वप्नाली तोडमल यांनी प्रास्ताविक केले. आशा चेमटे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी सीआयएफ संघांना ४२ लाख रूपयांचे वितरण करण्यात आले. आदर्श गट म्हणून राधाकृष्ण समुह काळकुप, ओंकार समुह जामगांव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. समन्वयक संदीप वाबळे यांनी अभियानाची माहीती दिली. यावेळी महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. ढवळपुरीच्या सखी सहेली समुहाने उमेद अभियानावर पथनाटय सादर केले.प्रभाग समन्वयक सचिन हाडवळे यांनही आभार मानले. उपस्थित महीलांच्या स्नेहभोजनानंतर वार्षिक सभेची सांगता झाली.

# समद पठाण साकारणार धार्मिक गाण्यात मुख्य भूमिका

## पिंपळगाव कौडा निझर्णेश्वरला होणार चित्रीकरण

**सुपा : प्रतिनिधी**



**साईबाबा यांच्या काळातील साईबाबा यांच्या सोबत वावरलेले. संत रघुनाथ बाबा यांनी त्याकाळी स्वतः च्या डोळ्यात सळ्या घालून समाधी घेतली आहे. त्यांची पावनभूमी श्रीक्षेत्र पिंपळगाव कौडा तालुका नगर येथील रामदास दळवी यांनी संत रघुनाथ बाबा आणि भगवान निझर्णेश्वर यांच्यावर आधारित गाणे लिहिले आहे.**

या गाण्याचे रेकॉर्डिंग पूर्ण झाले असून हे गाणे येता १४ आणि १८, १९ ऑगस्टला पिंपळगाव कौडा आणि निझर्णेश्वर येथे चित्रीत केले जाणार आहे.

या गाण्यांमध्ये शिरूर येथे १४ वर्षापासून कार्यरत असलेल्या नटराज कोहिनुर ड्रीम्स अकॅडमी ऑफ फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये सध्या डान्स कोर्सचे प्रशिक्षण घेत असलेले समद पठाण यांची मुख्य भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे. नटराज कोहिनूर अकॅडमी ऑफ फिल्म इन्स्टिट्यूट चे संचालक लेखक, दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे आणि अभिनेत्री, कोरिओग्राफर अश्विनी इरोळे यांनी त्यांच्याकडे अभिनय, डान्स, स्टोरी रायटिंग, फिल्म दिग्दर्शन, भाषण, सूत्रसंचालन इत्यादी कोर्स केलेल्या तीन वर्षापासून तर ७५ वर्षापर्यंत वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबरोबरच शेकडो विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

समद पठाण यांनी तीन महिन्यापूर्वी इन्स्टिट्यूट मध्ये डान्सचा कोर्स जॉईन केला आणि त्यांना धार्मिक गाण्यांमध्ये मुख्य भूमिका करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांचे त्यांच्या नातेवाईक, मित्रमंडळींकडून अभिनंदन केले जात आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com